सत्यमेव जयते

# शाश्वत विकास ध्येयांच्या (SDGs) नऊ संकल्पना

## Sustainable Development Goals 9 Themes

# राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान

# महाराष्ट्र राज्य

# सर्वांना सोबत घेऊन चालण्याची वैश्विक संकल्पना

संयुक्त राष्ट्र संघाने शाश्वत विकासाच्या उद्देशाने जाहीर केलेल्या ‘जागतिक कार्यक्रम २०३०’ मध्ये १७ शाश्वत विकासाची ध्येये व त्या अंतर्गत १६९ साध्ये यांचा समावेश असून हा कार्यक्रम १ जानेवारी २०१६ पासून लागू झाला आहे. ‘सर्वांना सोबत घेऊन चला’ (Leave no one behind) हा या जागतिक कार्यक्रमाचा गाभा आहे.

जागतिक कार्यक्रम-२०३० ची देशात प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी भारत सरकार कटीबध्द आहे. भारताची राष्ट्रीय विकास ध्येये व ‘सर्वांची योजना सर्वांचा विकास’ किंवा ‘सर्वांसोबत आणि सर्वांसाठी विकास’ ही धोरणे शाश्वत विकासाची ध्येये साध्य करण्यासाठी अनुरूप अशीच आहेत. विविध संस्था, संघटना, खाजगी क्षेत्रे, तरूण, समुदाय आणि घटकांशी समन्वयातून ही शाश्वत विकासाची ध्येये साध्य करणे निश्चितच शक्य होणार आहे.

# शाश्वत विकास ध्येयांच्या (SDGs) नऊ संकल्पना (थिम्स)



# 3) बालस्नेही गाव (Child friendly Village)

**अशा गावासाठी व्हिजन- गावातील सर्व मुलांना निर्धोक आणि सुरक्षित वातावरण तसेच चांगले गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि आरोग्य सेवा उपलब्ध करणे.**

| स्थानिक ध्येये | स्थानिक कार्यवाहीचे मुद्दे |
|---|---|
| 1. 100 % बाल मजूर मुक्त गाव.<br>2. 100% मुलांची शाळेमध्ये नोंदणी करणे.<br>3. तस्करीच्या प्रकरणांना आळा.<br>4. बालविवाहाचे प्रमाण कमी करणे.<br>5. मुलांसोबत होणा-या सर्व प्रकारच्या हिंसाचाराचे प्रमाण कमी करण्यासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे.<br>6. स्थानिक स्वशासनात मुलांचा सहभाग असल्याची खात्री करणे.<br>7. निर्धोक, सुरक्षित आणि स्वच्छ वातावरणाची खात्री करणे. | • **नियोजन आणि संनियंत्रण** (Plan & Monitor)-<br>➢ शाळांमध्ये दर्जेदार पायाभूत सुविधा व मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे.<br>➢ गुणवत्तापूर्ण शिक्षण- मुलांची शाळागळती नसणे.<br>➢ क्रिडांगण आणि ग्रंथालय.<br>➢ कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम.<br>➢ बालसभा/ बालकांची संसद<br>• **खात्री करणे(Ensure)-**<br>➢ बाल विवाह आणि तस्करीची प्रकरणे नसणे.<br>➢ शालेय गणवेश, पाठ्यपुस्तके, शिष्यवृत्ती अनुदान हे विध्यार्थ्यांचे हक्क आहेत, ते वेळेत उपलब्ध करुन देणे.<br>• **प्रोत्साहन देणे (Promote)-**<br>➢ अमली पदार्थ आणि मादक द्रव्ये यांचे सेवन घातक असल्याने त्याबद्दल विध्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण करणे.<br>➢ मुलांबाबतच्या कायदेशीर तरतुदींविषयी जागृती निर्माण करणे. |

# धन्यवाद !!

